# जिल्हा परिषद रत्नागिरी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन
माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२
समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथमिक)
दूरध्वनी क्र.:- ०२३५२-२७१००६ ई-मेल:-samgra.rtn@yahoo.com

जा.क्र.रजिप/शिक्षण/सशि-७/बांध/९४८/२०२५-२६

दिनांक :-०६.०३.२०२६

## जिल्हा परिषद शाळा पाजपंढरी, ता. दापोली, या शाळेसाठी शालेय फर्निचर खरेदीबाबत.

## दरपत्रके नोटीस

समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, रत्नागिरी अंतर्गत जि.प. शाळा पाजपंढरी, ता. दापोली या शाळेकरिता खाली नमूद केलेल्या तपशिलनुसार शालेय फर्निचर खरेदी करण्यासाठी पुढे दिलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहे.आपण आपली सीलबंद दरपत्रके मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या नावे दि.१२/०३/२०२६ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत पाठविणेत यावीत. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा मंजूरीसाठी विचार केला जाणार नाही. दरपत्रके त्याच दिवशी अथवा कार्यालयाचे सवडीनुसार उघडणेत येतील.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | साईज (इंच मध्ये) |
|---|---|---|
| १ | ऑफिस खुर्ची<br>(साग / शिसम किंवा PVC २ वर्षे वॉरंटीसह) | |
| २ | ऑफिस टेबल<br>(वूडबेस प्लायवूड High Density मध्ये २ वर्षे वॉरंटीसह) | ४८ X २४ X ३० |
| ३ | लोखंडी कपाट<br>(१८ गेज पावडर कोटेड, २ वर्षे वॉरंटीसह) | ७८ X ३६ X २० |
| ४ | भींतीवरील ग्रीन बोर्ड (२ वर्षे वॉरंटीसह ) | ७२ X ४८ |
| ५ | स्कूल बेंच<br>( MS स्के. पाईप फ्रेम, Top, Seat, Back Plywood २ वर्षे वॉरंटीसह) | ३६ X ३० |
| ६ | ग्रंथालय लोखंडी कपाट<br>(१८ गेज पावडर कोटेड, Glass Door २ वर्षे वॉरंटीसह) | ७८ X ३६ X २० |

यापूर्वी शालेय साहित्य पुरविले असल्यास त्याचा योग्य तो पुरावा सादर केल्यास प्राधान्य देण्यात येईल.

**अटी व शर्थी**

१. दरपत्रक हे कंपनीच्या किंवा दुकानाच्या लेटरहेडवर तयार करून सीलबंद लखोट्यातून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, रत्नागिरी येथे देण्यात यावे.

२.पुरवठादाराचा परवाना पत्र / जीएसटी नंबरचवी व पॅनकार्ड व आधार कार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत जोडण्यात यावी. (जीएसटी लागून नसल्यास तसे स्वयंघोषणापत्र सादर करावे.)

३. पुरवठा आदेश दिल्यानंतर १५ दिवसाचे आत नवीन साहित्य जि.प.शाळा पाजपंढरी, ता. दापोली येथे पुरवठा करणे बंधनकारक राहील. यात विलंब झाल्यास शासन पर्चेस मॅन्युअल नुसार प्रती आठवडा 0.5 टक्के ते 10 टक्के पर्यंत दंड आकारला जाईल.

४. दरपत्रक सादर करताना प्रती नगाची किंमत सर्व करासहीत व वाहतूक खर्चासहीत नमुद करावी.

५. पुरवठादार यांनी चालू आर्थिक वर्षात इन्कमटॅक्स रिटर्न्स भरल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

६. पुरवठा आदेश देणेपुर्वी सर्व अटी शर्ती मान्य असल्यायावत रु.500/- चे मुद्रांक शुल्क बंधपत्रावर करारनामा करून देणे बंधकारक राहील.

७.पुरवठादार यांनी व्यवसाय प्रमाणपत्र सादर करावे.

८. पुरवठाधारकाने सादर केलेले दर हे दरपत्रक स्विकृतीच्या दिनांकापासून 31 मार्च 2026 पर्यंत ग्राह्य राहतील. जादा मालाचा पुरवठा करावयाचा असेल तर दिलेल्या दराप्रमाणे त्याच अटी व शर्ती नुसार पुरवठा करावा लागेल.

९.कोणतेही कारण न देता दरपत्रक मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

**दरपत्रके लिफाफा (BOQ)**

तांत्रिक कारणास्तव किंवा दरपत्रकामध्ये वाद निर्माण झाल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद रत्नागिरी यांजकडे राखून ठेवले आहेत. तसेच या दरपत्रकामधील अटी व शर्ती या बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचा निर्णय हा अंतिम निर्णय राहील. सदरची जाहिरात www.zpratnagiri.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

(निलिमा नाईक)
**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद रत्नागिरी.**